# महाराष्ट्र शासन
## सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
शासकीय तंत्रनिकेतन परिसर, सदर, नागपूर

**दुरध्वनी क्र.** 0712-2557266/46

E-mail : ronagpur@dtemaharashtra.gov.in Website : www.rdtenagpur.org.in

क्र.तशिस/विकाना/शैवि-१/ २०२१/2421 दिनांक:- 01 SEP 2021

प्रति,

प्राचार्य,

सर्व विनाअनुदानित पदविका/ पदवी व पदव्युत्तर पदवी संस्था,

नागपूर विभाग, नागपूर.

विषय:- महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क याचे विनियमन) अधिनियम २००५ च्या कलम २३ खाली तयार करण्यात आलेल्या नियमांचे पालन करणेबाबत.

संदर्भ :- महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग यांचे शासन परिपत्रक क्र. संकिर्ण-२०१८/प्र.क्र.४२७/तांशि-४, दि. ०३ जानेवारी, २०१९

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, उपरोक्त संदर्भिय शासन परिपत्रका अन्वये महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क याचे विनियमन) अधिनियम २००५ च्या कलम २३ खाली तयार करण्यात आलेल्या नियमांचे पालन करणेबाबत शासनाने कळविलेले आहे.

त्यास अनुसरुन आपणांस कळविण्यांत येते की, या विभागाच्या अधिपत्याखालील सर्व संस्थांनी महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क याचे विनियमन) अधिनियम २००५ च्या कलम २३ खाली तयार करण्यात आलेल्या नियमांचे काटोकोरपणे पालन करावे. तसेच या पत्रासोबत जोडण्यांत आलेल्या महाराष्ट्र शासनाच्या शासन परिपत्रकानुसार सर्व नियमांचे काटोकोरपणे पालन करुन कार्यवाही करण्यांत यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करण्यांत यावा.

सहपत्र : संदर्भिय परिपत्रक

(डॉ. मनोज भा. डायगव्हाणे)
प्र. सहसंचालक
तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, नागपूर.

G:\Meshram Degree File\Letters\Letter to All Institute.doc

महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क याचे विनियमन), अधिनियम, २०१५ च्या कलम २३ खाली तयार करण्यात आलेल्या नियमांचे पालन करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

उच्च व तंत्र शिक्षण विभाग,

शासन परिपत्रक क्र.संकीर्ण-२०१८/प्र.क्र.४२७/तांशि-४

मंत्रालय विस्तार भवन, मादाम कामा मार्ग,

हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०००३२.

दिनांक : ०३ जानेवारी, २०१९

वाचा :- १) शासन अधिसूचना, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्रमांक : टीईएम-२०१६/ सीआर.४७३/(भाग-३)/टीई-४, दिनांक २४ एप्रिल,२०१७

२) शासन अधिसूचना, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्रमांक : टीईएम-२०१६/ प्र.क्र.४७३/१६(भाग-४)/तांशि-४, दिनांक २४ एप्रिल,२०१७

३) शासन अधिसूचना, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्रमांक : टीईएम-२०१८/ सी.आर.२८/टीई-४, दिनांक ५ जून,२०१८

४) शासन अधिसूचना, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्रमांक : टीईएम-२०१८/ सी.आर.२६/टीई-४, दिनांक ५ जून,२०१८

परिपत्रक :

महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क याचे विनियमन), अधिनियम, २०१५ च्या कलम २०(१) मधील तरतूद खालीलप्रमाणे आहे :-

(१) कोणत्याही व्यक्तीने, या अधिनियमाच्या किंवा त्याखाली केलेल्या नियमांच्या कोणत्याही तरतुदींचे उल्लंघन केले आहे असे, जर नियामक प्राधिकरणाचे मत झाले असेल तर त्यास, अशा व्यक्तीला,--

(क) पहिल्या वेळेच्या उल्लंघनाबद्दल, एक लाख रुपयांहून कमी नसेल परंतु, पाच लाख रुपयांपर्यंत असू शकेल एवढी किंवा या अधिनियमान्वये निर्धारित केलेल्या शुल्कापेक्षा अधिक घेतलेल्या रकमेच्या दुप्पट रकमेएवढी, यापैकी जी अधिक असेल, एवढी शास्ती भरण्याचे;

(ख) दुसऱ्या किंवा नतंरच्या उल्लंघनाबद्दल, दोन लाख रुपयांहून कमी नसेल परंतु, दहा लाख रुपयांपर्यंत असू शकेल एवढी किंवा या अधिनियमान्वये निर्धारित केलेल्या शुल्कापेक्षा अधिक घेतलेल्या रकमेच्या दुप्पट रकमेएवढी, यापैकी जी अधिक असेल, एवढी शास्ती भरण्याचे; निदेश देता येतील.

२. महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क याचे विनियमन), अधिनियम, २०१५ च्या कलम २३ व्दारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन पूर्ण वेळ व्यावसायिक पदव्युत्तर पदवी तांत्रिक पाठ्यक्रम अभ्यासक्रमाचे प्रथम वर्ष व थेट व्दितीय वर्ष अभियांत्रिकी व तंत्रज्ञान, औषधनिर्माणशास्त्र, वास्तुशास्त्र, हॉटेल व्यवस्थापन व खाद्यपेय व्यवस्था तंत्रज्ञान, व्यवस्थापनशास्त्र, संगणक उपयोजन (Computer Application) तसेच पूर्ण वेळ व्यावसायिक पदवीपूर्व तांत्रिक पाठ्यक्रमांचे प्रथम वर्ष व थेट व्दितीय वर्ष अभियांत्रिकी व तंत्रज्ञान, औषधनिर्माणशास्त्र, वास्तुशास्त्र, हॉटेल व्यवस्थापन व खाद्यपेय व्यवस्था तंत्रज्ञान या अभ्यासक्रमामध्ये द्यावयाचे प्रवेश विनियमित करण्यासाठी दिनांक २४ एप्रिल,२०१७ रोजी दोन स्वतंत्र नियम अधिसूचित करण्यात आले आहेत. या दोन्ही नियमांना दिनांक ५ जून,२०१८ च्या दोन स्वतंत्र अधिसूचनेव्दारे सुधारणा करण्यात आलेली आहे. या दोन्ही नियमांच्या मुख्य नियमांमध्ये नियम १५ समाविष्ट करण्यात आलेला आहे. पदव्युत्तर पदवी व पदवीपूर्व अभ्यासक्रमांच्या प्रवेशाच्या या दोन्ही सुधारणा नियमातील नियम क्रमांक १५(ग) मधील तरतूद पुढीलप्रमाणे आहे :-

१५. प्रवेश रद्द करणे व शुल्काचा परतावा, संस्थेव्दारे कागदपत्र परत देणे, -
(ग) "कोणतीही संस्था, ज्यांच्याकडे उमेदवारांनी त्यांची प्रमाणपत्रे, पदविका/ पदवी, व इतर कागदपत्रे त्या संस्थेमध्ये प्रवेशासाठी जमा केलेली असतील, व जर उमेदवार अशा संस्थेमध्ये अभ्यासक्रम पुढे चालू ठेवण्यासाठी किंवा त्या संस्थेतील सुविधा घेण्यासाठी इच्छुक नसतील अशा प्रसंगी जमा करण्यात आलेली प्रमाणपत्रे, पदविका/पदवी, व इतर कागदपत्रे उमेदवारास परत करण्यास कोणत्याही प्रकारे विरोध करणार नाहीत किंवा त्यासाठी अशा अभ्यासक्रमाचे किंवा इतर कोणतेही शुल्क अदा करण्यासाठी त्याच्यावर दबाव टाकणार नाहीत."

३. वर नमूद केल्याप्रमाणे अधिनियमातील तरतूदी व त्या खाली तयार केलेल्या नियमातील तरतूदी पाहता कोणत्याही संस्थेस विद्यार्थ्याने त्यांच्याकडे जमा केलेली प्रमाणपत्रे, पदविका/पदवी व इतर कागदपत्रे कोणत्याही कारणास्तव स्वत:कडे ठेऊन घेता येणार नाहीत. कोणत्याही परिस्थितीत कागदपत्रांची विद्यार्थ्याने मागणी केल्यास संस्थेला ती विद्यार्थ्याला परत करावीच लागतील. नियमातील या तरतूदीचे काटेकोरपणे पालन करण्याच्या सूचना सर्व विभागीय तंत्रशिक्षण सहसंचालक यांनी तंत्र शिक्षण संचालनालयाच्या अखत्यारितील सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्थांना द्याव्यात. त्याचप्रमाणे, विद्यार्थ्याची मूळ कागदपत्रे संस्था परत करीत नसल्याबाबत तक्रार प्राप्त झाल्यास त्या विद्यार्थ्यास सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई यांचेकडे तक्रार दाखल करण्याचा सल्ला द्यावा. तसेच विभागीय तंत्र शिक्षण सहसंचालक यांनी वर नमूद अधिनियमातील व त्याखालील नियमातील तरतूदी संस्थेच्या

निदर्शनास आणून विद्यार्थ्यांचे मूळ कागदपत्रे ३ दिवसाच्या आत त्यास परत करण्याचे संस्थेस सूचित करावे. याउपरही, संस्थेने नियमातील तरतूदीचे पालन करीत नसल्याचे विभागीय तंत्र शिक्षण सहसंचालक यांच्या निदर्शनास आल्यास त्यांनी अशा संस्थांविरुध्द महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क याचे विनियमन ), अधिनियम, २०१५ मधील कलम २० नुसार शास्ती करण्याचा प्रस्ताव तंत्र शिक्षण संचालकांकडे पाठवावा. तंत्र शिक्षण संचालकांनी हा प्रस्ताव प्रवेश नियामक प्राधिकरणासमोर उचित अभिप्रायासह ठेवावा व तसे विद्यार्थ्यास सूचित करावे.

४. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०१०३१२०१०५८००८ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Sanjay A. Dharurkar

Digitally signed by Sanjay A. Dharurkar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Higher and Technical Education Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=a637145fd393d6d5c713e94e6da7bc6bee23011448b7fc6fd138630b9c76ae7a2, cn=Sanjay A. Dharurkar
Date: 2019.01.03 15:03:04 +05'30'

**( संजय औ. धारुरकर )**
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१) संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२) सर्व सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये

**प्रत :**

१) आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, ३०५, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४९, खेरवाडी, अलियावर जंग मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१
२) सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, ३०५, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४९, खेरवाडी, अलियावर जंग मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१
३) संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
४) सर्व सहसचिव/उपसचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
५) मा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे विशेष कार्य अधिकारी,
६) मा.राज्यमंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव,
७) निवड नस्ती (तांशि-४)